0 2 APR 2024
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# महा-स्वयं पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांना दर्जेदार ऑनलाईन शिक्षण!

## शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी; पाच प्रमुख विद्यापीठांमध्ये करार

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

केंद्र सरकारच्या धर्तीवर विद्यार्थ्यांना परवडणाऱ्या शुल्कात व त्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन महा-स्वयं पोर्टलची निर्मिती सुरू आहे. याबाबत पाच प्रमुख विद्यापीठांमध्ये करार झाला आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून याची अंमलबजावणी होणार आहे. शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सुमारे २ लाख ५० हजारांहून अधिक विद्यार्थी ऑनलाईन शिक्षण घेऊ शकणार आहेत.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अनेक आमूलाग्र बदल करण्यात आले आहेत. ६० टक्के अभ्यासक्रम प्रत्यक्ष, तर ४० टक्के ऑनलाईन शिक्षण देण्याचा समावेश आहे; परंतु राज्यात दर्जेदार ऑनलाईन शिक्षण सर्वच विद्यापीठांमध्ये देण्याची सुविधा उपलब्ध नसल्याचे चित्र आहे. त्या पार्श्वभूमीवर काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र शासन व शिवाजी विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व मुंबईतील एसएनडीटी महिला विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार झाला आहे.



> महा-स्वयं पोर्टलच्या माध्यमातून राज्यातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणाची संधी मिळणार आहे. महिनाभरात याची नियमावली प्रसिद्ध केली जाणार आहे. विद्यार्थ्यांना एकसारखा चांगला अभ्यासक्रम याच्या माध्यमातून शिकता येणार आहे.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के,**
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

करारानुसार महा-स्वयं पोर्टल विकसित करण्याचे काम सुरू आहे. यासाठी राज्यस्तरीय समिती गठित केली आहे. मुक्त विद्यापीठ या कोर्सेसचे व्यवस्थापन करणार आहे. महा-स्वयं पोर्टलद्वारे भारतीय ज्ञान कौशल्यावर आधारित ४० ऑनलाईन कोर्सेस विकसित केले जाणार आहेत. ऑनलाईन लेक्चर्स, व्हिडीओ यांचा समावेश असेल. अपार आयडी रजिस्टर असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश असणार आहेत. कोर्स पूर्ण केल्यानंतर ते क्रेडिट पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी उपयोगी ठरणार आहेत. ऑनलाईन शिक्षणाचा राज्यातील ४० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे.

02 APR 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# विद्यापीठ लवकरच ठरविणार 'पीएच.डी.' प्रवेशाची दिशा

## अधिष्ठाता मंडळामध्ये होणार चर्चा; अधिविभागांना करणार मार्गदर्शन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) राष्ट्रीय पात्रता परीक्षेला (नेट) पीएच. डी. प्रवेश परीक्षेचा दर्जा दिला आहे. त्यानुसार सर्व विद्यापीठांना कार्यवाही करावी लागणार आहे. त्यादृष्टीने शिवाजी विद्यापीठ लवकरच दिशा ठरविणार आहे. 'युजीसी'च्या मार्गदर्शक सूचनांबाबत विद्यापीठाच्या अधिष्ठाता मंडळामध्ये चर्चा होऊन पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

विविध विद्याशाखांतील पीएच. डी. अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी विद्यापीठांच्या पातळीवर सध्या स्वतंत्रपणे पीएच.डी. प्रवेश परीक्षा (पेट) घेतली जाते. त्याऐवजी 'नेट' परीक्षेच्या माध्यमातून आता प्रवेश प्रक्रिया राबविण्याचा निर्णय युजीसीने घेतला आहे. त्यासाठी



'नेट' परीक्षेत तीन श्रेणी ठरविण्यात आल्या आहेत. त्यामधील पहिल्या श्रेणीत सर्वाधिक गुण असणारे विद्यार्थी राहतील. पीएच.डी. प्रवेश आणि पाठ्यवृत्तीसह जेआरएफ, सहायक प्राध्यापक पदासाठी ते पात्र ठरणार आहेत. त्यांना पीएचडी प्रवेशासाठी मुलाखत द्यावी लागणार आहे. युजीसीने नेट परीक्षेला पीएच. डी. प्रवेश परीक्षेचा दर्जा दिल्याने सध्या असलेल्या 'पेट' परीक्षांबाबत विद्यापीठांना विचार करावा लागणार आहे.

### संशोधन वाढीला पोषक वातावरण

'युजीसी केंद्रीय पद्धतीने परीक्षा घेणार असल्याने पारदर्शकता, गुणवत्ता, उत्तम दर्जाचे संशोधन वाढीसाठी अधिक पोषक वातावरण निर्माण होईल,' अशी प्रतिक्रिया शिवाजी विद्यापीठातील औद्योगिक रसायनशास्त्र अधिविभागातील सहायक प्राध्यापक डॉ. राहुल माने यांनी व्यक्त केली.

### 'युजीसी'ने याचा विचार करावा

'नेट' परीक्षेला पीएच.डी. प्रवेश परीक्षेचा दर्जा देण्याचा निर्णय खूप चांगला आहे. मात्र, विद्यार्थ्यांना या परीक्षेचा अर्ज भरताना त्यामध्ये त्याने नेट जीआरएफ, नेट शिक्षक, नेट पीएच.डी. एंट्रन्सपैकी एक पर्याय निवडावा लागणार आहे. या पर्यायांनुसार मेरिट वेगवेगळे लागणार आहे. त्यात पीएच. डी. प्रवेशासाठी स्वतंत्र मेरिट असणार आहे. असे पर्याय देण्याऐवजी युजीसीने पीएच.डी. प्रवेशासाठी स्वतंत्र परीक्षा घेतली तर अधिक चांगले होईल, अशी मागणी विद्यार्थ्यांमधून होत आहे.

"'नेट' परीक्षेच्या माध्यमातून पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया राबविण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे. त्याबाबतची शिवाजी विद्यापीठाची दिशा ठरविण्यात येईल. याअनुषंगाने अधिष्ठाता मंडळात आज चर्चा केली जाणार आहे.

**-डॉ. पी. एस. पाटील,** प्र-कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ

| विद्यापीठातील वर्षनिहाय पीएच.डी. प्रवेशित विद्यार्थी | |
|---|---|
| २०१६-१७ | ७०७ |
| २०१७-१८ | ६८९ |
| २०१८-१९ | ५४७ |
| २०१९-२० | ५०९ |
| २०२०-२१ | ५६९ |
| २०२१-२२ | ५६४ |

| वर्षनिहाय पीएच.डी. पदवी मिळविलेले विद्यार्थी | |
|---|---|
| २०१६ | ३०५ |
| २०१७ | १९२ |
| २०१८ | २८० |
| २०१९ | २६० |
| २०२० | ३५२ |
| २०२१ | १७१ |
| २०२२ | २२४ |
| २०२३ | ५६३ |

02 APR 2024 तरूण भारत जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सत्तर टक्के परीक्षा कॉपीमुक्त

- शिवाजी विद्यापीठातील परीक्षा प्रमाद समितीचा पारदर्शी कारभार
- शिक्षक, कर्मचाऱ्यांना पेपरफुटीची धास्ती
- पेपर फुटीच्या प्रकरणात बडतर्फीची भीती कायम

**अहिल्या परकाळे**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील परीक्षा पारदर्शी व्हाव्या म्हणून परीक्षा विभागाने महाविद्यालयांना सूचना दिल्या आहेत. परीक्षा कॉपीमुक्त होण्यासाठी तीन जिल्ह्यासाठी तीन बैठ्या पथकांची नियुक्ती केली आहे. अतिसंवेदनशील परिसरातील महाविद्यालयांवर करडी नजर ठेवली जात आहे.

गतवर्षी दोन महाविद्यालयात पेपरफुटीचा प्रकार घडल्यानंतर परीक्षा प्रमाद समितीसमोर दोषींची सुनावणी झाली. चौकशीअंती संबंधीत महाविद्यालयातील दोषींना बडतर्फ केल्यामुळे शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी पेपरफुटीची धास्तीच घेतली आहे. कॉपीबहाद्दरांवरही त्वरीत कारवाई होत आहे. परीक्षार्थींमधील कॉपीबहाद्दरांवर विद्यापीठाची करडी नजर असल्याने विद्यापीठातील ७० टक्के परीक्षा कॉपीमुक्त झाल्या आहेत.

शिवाजी विद्यापीठांतर्गत काही महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांनी केलेल्या कॉपीकडे दुर्लक्ष केले जायचे. परिणामी गेल्या तीन वर्षात पेपरफुटीसारखे प्रकार उघडकीस आले. संबंधीत कॉपीबहाद्दरांवर कडक कारवाई झालीच, पण पेपरफुटी प्रकरणात महाविद्यालयांतील काही दोषींना नोकरीवरून बडतर्फ केले. त्याचाच धसका कर्मचारी, शिक्षकांनी घेतला आहे. त्यामुळे बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी.च्या परीक्षेत एकही



पेपरफुटीचा प्रकार आढळला नसल्याचे समोर आले आहे.

एसआरपीडीवरील प्रश्नपत्रिकांची प्रिंट, झेरॉक्सही काही प्राचार्य आणि शिक्षक स्वत: काढत आहेत. सर्वच महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे निर्वाणीचा इशारा दिल्याने परीक्षेतील पेपरफुटीला आळा बसल्याचे निदर्शनास येत आहे. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. च्या सर्व परीक्षा सोमवारी संपल्या. आता पदव्युत्तर पदवी, एम.ए.च्या परीक्षांना प्रारंभ होत आहे.

विद्यापीठ परीक्षा विभागातील अधिकारीही अचानक परीक्षा केंद्रांना भेटी देत असल्याने कारवाईची भीतीही महाविद्यालयांना आहे. महाविद्यालयीन पातळीवर कॉपीचे प्रकार घडत होते. अशा महाविद्यालयांत परीक्षा अतिशय कडक नियमांमध्ये घेतली जात आहे. गतवर्षी मात्र ३ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी कॉपी केल्याचे निदर्शनास आले होते. यातील दोषींवर परीक्षा प्रमाद समितीने कडक कारवाई केल्याने आतापर्यंत सुमारे २०० कॉपीचे प्रकार उघडकीस आले. त्यामुळे कॉपीचे प्रमाण कमी झाल्याचे चित्र आहे.

### १३ दिवसांत निकाल जाहीर करण्याचा निर्धार

विद्यापीठाने स्वत:ची संगणकीय एसआरपीडीची सिस्टीम विकसित केली आहे. त्यामुळे सुरू असलेल्या परीक्षांचे निकाल १३ दिवसात जाहीर करण्याचा निर्धार विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने केला आहे. परिणामी विद्यार्थ्यांना वेळेत निकाल मिळेल अन त्यांच्या पुढील शिक्षणाचा मार्ग रिकामा होणार आहे.

### परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी प्रयत्न

विद्यापीठ परीक्षा पारदर्शी व्हावी यासाठी विद्यापीठाने महाविद्यालयांना सूचना दिल्या आहेत. प्रत्येक केंद्र कॉपीमुक्त व्हावे, यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे. त्यामुळे यंदा ७० टक्के परीक्षेत कॉपीचे प्रमाण कमी झाले आहे. कॉपीसह पेपर फुटी प्रकरणात संबंधितांवर कडक कारवाई केली जाणार आहे. विद्यार्थ्यांनी नियमांचे पालन करत परीक्षा द्यावी.

**– डॉ. अजितसिंह जाधव**
**(संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, शिवाजी विद्यापीठ)**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 APR 2024
तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षेतील आठ अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल–२०२४ उन्हाळी सत्रातील 'पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु आहेत. सोमवारी ८ अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर करण्यात आले. दोन दिवसात निकाल जाहीर केले आहेत. परीक्षेचे पेपर तपासणीसंदर्भात केलेले वेळापत्रक आणि नवीन विकसित तंत्रज्ञानाचा फायदा होत असल्याने परीक्षा विभागाचे काम सोपे झाले आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली आहे. शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सोमवारी १८ विषयांची परीक्षा झाली. या परीक्षेला ९ हजार २६८ पैकी ८ हजार ४८५ विद्यार्थी उपस्थित होते. तर ७८३ विद्यार्थी अनुपस्थित होते. भरारी पथकाकडून सांगली ४, कोल्हापूर २८,असे दोन जिल्ह्यातून ३२ कॉपीच्या प्रकारांची नोंद केली आहे. परीक्षा प्रमाद समितीसमोर सुनावणी होऊन गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कारवाई केली जाणार आहे. तरी विद्यार्थ्यांनी नियमांच्या आधीन राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा विभागातर्फे करण्यात आले.

- **परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांची माहिती**
- **सोमवारी झालेल्या परीक्षेत ३२ कॉपीचे प्रकार उघडकीस**

02 APR 2024
पुढारी



# विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र परीक्षेला ९,२६८ विद्यार्थी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षेला ९ हजार २६८ विद्यार्थी बसले, त्यापैकी ७८३ विद्यार्थी अनुपस्थित होते.

विद्यापीठातर्फे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत. सोमवारी बॅचलर ऑफ आर्टस्, बॅचलर ऑफ सायन्स, बॅचलर ऑफ कॉमर्स, बॅचलर ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन, बॅचलर ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट, मास्टर ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन आदी, अभ्यासक्रम परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयामध्ये सुरळीतपणे पार पडल्या. दरम्यान, दि. १ रोजी बी. व्होकच्या ८ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले.

विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. १ एप्रिल रोजी या पथकांकडून सांगली (४), कोल्हापूर (२८) या दोन जिल्ह्यांतून ३२ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद केली आहे. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

02 APR 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# केआयटीमध्ये 'टेक फ्युजन' उत्साहात

## दोनशे विद्यार्थ्यांचा सहभाग; लीड कॉलेजअंतर्गत स्पर्धा

**सकाळ वृत्तसेवा**

कंदलगाव, ता. १ : शिवाजी विद्यापीठाच्या लीड कॉलेज योजनेच्या अंतर्गत 'टेक फ्युजन' या प्रोजेक्ट स्पर्धेचे आयोजन केआयटी अभियांत्रिकी (स्वायत्त) महाविद्यालयांमध्ये केले होते. स्पर्धेमध्ये सात महाविद्यालयांतील ५० प्रोजेक्ट व २०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण कल्पनांना प्रोत्साहन देणे, त्यांच्यात प्रश्नांची उकल काढण्याचे कौशल्य विकसित करणे, तांत्रिक कौशल्य वाढवणे, आंतर विभागीय विद्यार्थ्यांमध्ये समन्वय तसेच सहकार्याची भावना वाढवणे, विद्यार्थ्यांना व्यावसायिक क्षेत्राशी जोडून तेथील अनुभव त्यांना देण्यासाठी स्पर्धेचे आयोजन केले होते. आपल्या परिसरातील तांत्रिक प्रश्नांना उत्तरे देण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी या स्पर्धेच्या माध्यमातून केला.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून व्यावसायिक क्षेत्रातून तंत्रज्ञ सर्जेराव आरगे यांच्यासह प्राध्यापकांना निमंत्रित केले होते. स्पर्धेचे समन्वयक म्हणून डॉ. अमित सरकार, सहसमन्वयक म्हणून डॉ. मनोज यादव यांनी काम पाहिले. प्रा. निखिल सौंदत्तीकर यांनींही योगदान दिले. प्रा. वैष्णवी देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. संस्थेचे संचालक डॉ. मोहन वनरोट्टी, रजिस्ट्रार डॉ. मनोज मुजुमदार यांचे मार्गदर्शन व संस्थेचे अध्यक्ष सुनील कुलकर्णी, उपाध्यक्ष साजिद हुदली, सचिव दीपक चौगुले यांचे स्पर्धा आयोजनासाठी प्रोत्साहन लाभले.



कंदलगाव : 'केआयटी'मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या लीड कॉलेज अंतर्गत 'टेक फ्युजन' स्पर्धा झाली. यामध्ये सहभागी स्पर्धक, परीक्षक, व्यावसायिक व प्राध्यापक.

### स्पर्धेचा निकाल

- प्रथम क्रमांक - कृतिका गोडबोले व अन्य (केआयटी)
- द्वितीय क्रमांक - (विभागून) धनंजय पवार व अन्य (भारती विद्यापीठ), विवेक मंगसुळे व अन्य (डी.के.टी.ई.)
- तृतीय क्रमांक - (विभागून) पारशती भागवत व अन्य (डी. के. टी. ई.), प्रणव सातपुते व अन्य (डी.के.टी.ई.)